जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 2 NOV 2025 सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणपत्रिकेची प्रत पदवीधरांना तत्काळ देणार

## पदवीधर निवडणूक; कुलसचिवांचे 'पदवीधर मित्र'ला आश्वासन

कोल्हापूर, ता. २१ : पदवीधरांच्या मागणीनुसार एकाच दिवसात गुणपत्रिकेची प्रत शिवाजी विद्यापीठाकडून दिली जाणार आहे. त्याबाबत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी 'पदवीधर मित्र'चे अध्यक्ष माणिक पाटील-चुयेकर यांच्या नेतृत्वाखालील भेटलेल्या शिष्टमंडळाला आश्वासन दिले.



सध्या विधानपरिषदेच्या पुणे मतदारसंघात पुढील वर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीची मतदार नोंदणी प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. ही मतदार नोंदणी करताना अर्जासोबत गुणपत्रिका अथवा पदवी प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य आहे. परंतु, पुणे पदवीधर मतदारसंघात येणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांतील अनेक ज्येष्ठ तसेच वयोवृद्ध पदवीधरांकडे गुणपत्रिका तसेच पदवी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत. त्यांनी विद्यापीठाकडून गुणपत्रिकेची प्रत तत्काळ मिळाल्यास त्यांचा पदवीधर मतदार नोंदणीचा आणि या निवडणुकीतील मतदानाचा मार्ग सुकर होणार असल्याची माहिती माणिक पाटील-चुयेकर यांनी दिली.

22 NOV 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणपत्रिकेची प्रत पदवीधरांना तत्काळ देणार

## विद्यापीठ प्रशासनाचे 'पदवीधर मित्र'ला आश्वासन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदवीधरांच्या मागणीनुसार एकाच दिवसात गुणपत्रिकेची प्रत देण्याचे आश्वासन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पदवीधर मित्रचे अध्यक्ष माणिक पाटील-चुयेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळास दिले.

पदवीधर मित्रच्या पदाधिकाऱ्यांनी कुलसचिव डॉ. शिंदे यांनी नुकतीच भेट घेऊन निवेदन दिले. सध्या विधानपरिषदेच्या पुणे मतदारसंघात पुढील वर्षी नोव्हेंबर- डिसेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीची मतदार नोंदणी प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. मतदार नोंदणी करताना मतदार नोंदणी अर्जासोबत गुणपत्रिका अथवा पदवी प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य आहे; परंतु पुणे पदवीधर मतदारसंघात येणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ तसेच वृद्ध पदवीधराकडे गुणपत्रिका अथवा पदवी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.

त्यांना विद्यापीठाकडून गुणपत्रिकेची प्रत तत्काळ मिळाल्यास त्यांचा पदवीधर मतदार नोंदणीचा तसेच या निवडणुकीतील मतदानाचा मार्ग सुकर होणार आहे, असे चुयेकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

2 2 NOV 2025

तरुण भारत

# पदवीधरांना गुणपत्रिका देण्याचे कुलसचिवांचे आश्वासन

कोल्हापूर : पदवीधरांच्या मागणीनुसार एकाच दिवसात गुणपत्रिकेची प्रत देण्याचे आश्वासन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास शिंदे यांनी पदवीधर मित्रचे अध्यक्ष माणिक पाटील-चुयेकर यांच्या नेतृत्वाखालील याबाबत भेटलेल्या शिष्टमंडळास दिले. सध्या विधानपरिषदेच्या पुणे मतदार संघात पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीची मतदार नोंदणी प्रशासकीय पातळीवर सुरू आहे. ही मतदार नोंदणी करताना मतदार नोंदणी अर्जासोबत गुणपत्रिका अथवा जी-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य आहे. परंतु पुणे पदवीधर मतदार संघात येणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्हयातील वयोवृद्ध पदवीधराकडे गुणपत्रिका अथवा पदवी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत. त्यांना विद्यापीठाकडून गुणपत्रिकेची प्रत तात्काळ मिळाल्यास त्यांचा पदवीधर मतदार नोंदणीचा तसेच या निवडणुकीतील मतदानाचा मार्ग सुकर होणार आहे.

2 2 NOV 2025

तरुण भारत

# विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षेतील ६ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील शुक्रवारी ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. हिवाळी सत्रातील परीक्षा ३ नोव्हेंबरपासून सुरु झाल्या आहेत. शुक्रवारी विविध ७४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने परीक्षा केंद्रावर पार पडल्या. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रणासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. पथकाकडून शुक्रवारी कोल्हापूर १० व सांगली २ अशा १२ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

2 2 NOV 2025
तरुण भारत

# शितल कुलकर्णी यांना पीएच.डी.

**कोल्हापूर:** विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या संशोधक शितल कुलकर्णी यांना



पीएच. डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी द कंटेम्परी वेस्टर्न व्ह्यू ऑफ रशिया : अ स्टडी ऑफ सिलेक्टेड ट्रॅव्हलॉग्स ऑफ ट्वेंटी फर्स्ट सेंचुरी यावर शोध प्रबंध सादर केला. त्यांना डॉ. मेघा पानसरेंचे मार्गदर्शन लाभले.